# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १७५** **दि ०१/०७/२०२१**

## आरोपीस ताब्यात घेवून अल्पवयीन मुलीची केली सुटका, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांची कामगिरी

दिनांक २८.०८.२०१५ रोजी दुपारी १३.३० वाजताचे सुमारास फिर्यादीचे राहते घरातून त्यांची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्षे, हिस कोणीतरी अज्ञात इसमाने, अज्ञात कारणावरुन फुस लावून पळवून नेले असल्याबाबतच्या दिलेल्या तक्रारीवरुन भाईंदर पोलीस ठाणे येथे गुरनं १९०/२०१५ भादंवि सं. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हा दाखल झालेपासून यातील अल्पवयीन मुलीचा अदयापपावेतो शोध लागलेला नव्हता मात्र सदर गुन्हयातील अपहृरीत मुलीचे आई-वडील आणि इतर नातेवाईक यांचे सतत संपर्कात राहून तसेच गुन्हा घडले परिसरात आणि इतर संभाव्य ठिकाणी भेटी देवून अपहृत मुलगी व संशयीत आरोपी बाबत अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाने माहिती घेतली. तसेच तांत्रीक बाबींचा कौशल्याने वापर करुन यातील आरोपी नामे अनिल कुमार राय यास घर नं २७३९, गल्ली नं.२४, संजय कॉलनी, सेक्टर नं. २३, फरीदाबाद, हरियाणा येथून स्थानिक पोलीसांचे मदतीने अल्पवयीन मुलीसह ताब्यात घेवून यातील अल्पवयीन मुलीची सुटका करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. संपतराव पाटील, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर, पो.हवा. २२६९ उमेश पाटील, पो.हवा. १६३ रामचंद्र शिवाजी पाटील, पोना. २६३८ सम्राट गावडे, मपोना. २८४५ कमल चव्हाण नेम. अ.मा.वा.प्रति.कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

-----oooo-----